## नि.दि.दावा क्र.७२/२०२५ मधील नि.क्र.२१ वरील आदेश

**(पारित दि.२३/०४/२०२५)**

**०१.** प्रस्तुत विशेष अर्ज वादीने प्रतिवादींविरूद्ध तुर्तातुर्त ताकीद मिळण्यासाठी दाखल केला असून वादीचे कथन आहे की, मौजे कडेगांव, ता.कडेगांव येथील गट क्र.९०५, गट क्र.१०८०, गट क्र.१०९०, गट क्र.१०९७/६ व गट क्र.१०९८ च्या जमीनी (संक्षेपासाठी यापुढे ज्यास 'दावा मिळकत' असे संबोधले आहे) या वादी व प्रतिवादींच्या कुटुंबाच्या मिळकती असून सदर दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ८५ अन्वये वाटप झालेले असून सदर दावा मिळकतीत वादीला दत्तकपत्राने कै.गणपती कृष्णा माळी यांच्या ०८ आणे हिश्श्याची मिळकत व वादीचे जनक वडील शंकर संतू माळी यांच्या वडीलार्जित मिळकतीमधील ०४ आणे हिश्श्याची मिळकत वादीला मिळालेली असून वादीची दावा मिळकतीमध्ये शांततामयरित्या प्रत्यक्ष कब्जेवहिवाट आहे आणि दावा मिळकतीमध्ये सोयाबीन, गहू, ज्वारी, ऊस, द्राक्षे, केळी, भुईमूग अशी नगदी पिके वादी घेत असून त्यांची संपूर्ण कल्पना प्रतिवादींना पूर्वीपासून आहे, तरीदेखील दावा मिळकतीमध्ये केलेले गहू, द्राक्षे, सोयाबीन व ऊस पिक काढण्यासाठी वादी गेले असता प्रतिवादींनी संगनताने भाड्याने गावगुंड जमा करून वादीला दावा मिळकतीमधील पिके काढण्यास मज्ज्ाव करून शिवीगाळ केल्याने दि.२७/१०/२०२४ रोजी वादीने कडेगांव पोलीस ठाणे येथे तक्रार देऊनही पोलीसांनी प्रतिवादींविरूद्ध कोणतीही कारवाई केली नाही, त्यामुळे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम १६४ प्रमाणे कामकाज चालविण्याबाबतचे निवेदन तहसिलदार कडेगांव यांना दिले असता एम.ए.जी.चॅ.केस-एस.आर.२४६/२०२५ चे कामकाज चालवून तहसिलदार कडेगांव यांनी दि.०१/०४/२०२५ रोजीच्या आदेशाने 'दावा मिळकतीत मे.कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून वादी व प्रतिवादी यांनी आपली वहिवाट करावी, तोपर्यंत सदर शेतजमीन वादाची असल्याकारणाने जैसे थे स्थिती ठेवावी, तसेच, प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकतीमधील वहिवाटीसाठी हरकत व अडथळा करू नये' असे निर्देश दिले होते, त्यानंतरही प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील सध्या असलेली गहू, द्राक्षे पिक काढण्यास हरकत अडथळा केल्याने प्रतिवादींनी तहसिलदार कडेगांव यांच्या आदेशाचे पालन केले नसल्याबद्दल वादीने दिलेल्या तक्रारीवरून क्र.एम.ए.जी/कावी/२४६/२०२५ ने तहसिलदार कडेगांव यांनी पोलीस निरीक्षक कडेगांव यांना दावा मिळकतीमधील वादीचे द्राक्षे व गहू पिक बाहेर काढण्यास पोलीस बंदोबस्त मिळण्याबाबत आदेश देऊन सदर पत्र दि.०४/०४/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक कडेगांव यांना दिले होते, परंतु, पोलीस निरीक्षक कडेगांव यांनी वादीला कोणताही पोलीस बंदोबस्त न दिल्याने प्रतिवादींनी वादीला 'तू कोठेही जा, तुला तुझे पिक काढू देणार नाही, तुझे द्राक्षाचे व गव्हाचे पिक कुजवून घालवणार' अशी दमदाटी करून शिवीगाळ करून वादीला दावा मिळकतीमध्ये येण्यास मज्ज्ाव केला असून दावा मिळकतीमधून वादीचे गहू (१२५ टन) व द्राक्षे (४० टन) पिक प्रतिवादींनी वादीला काढू न दिल्यास वादीचे पैशात भरून न येणारे अपरिमित नुकसान होणार असून वादी कर्जबाजारी होणार असल्याने प्रतिवादींनी स्वत: अथवा

MADHAVI RAMESH PATKAR

Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.04.23 17:56:39 +0530

त्यांच्यातर्फे अन्य इसमामार्फत दावा मिळकतीमधील वादीचे गहू (१२५ टन) व द्राक्षे (४० टन) पिक काढण्यास वादीला हरकत अडथळा करून नये, अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींना देण्यासाठी वादीने विनंती केली आहे.

**०२.** प्रतिवादींनी नि.क्र.२६ येथे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले असून वादीच्या अर्जातील कथने प्रतिवादींनी नाकारली आहेत. प्रतिवादींनी कथन केले आहे की, वादींनी दिलेला दावा मिळकतीचा तपशील खोटा, दिशाभूल करणारा व चुकीचा असून वादीला संपूर्ण दावा मिळकतीचा कायदेशीर मालकी व कब्जा दावा दाखल केला त्यावेळी प्राप्त झालेला असल्याबाबतचा कोणताही पुरावा वादीने दिलेला नाही, वादीने दावा मिळकतीचे खरे व चतु:सीमापूर्वक वर्णन दिलेले नाही, दावा मिळकती संदर्भात महसूल न्यायाधिकरणांकडे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये प्रकरण प्रलंबित असून त्याबाबत कोणतेही कथन अथवा महसूल न्यायाधिकरणाचे न्यायनिर्णय वादीने याकामी नमूद केलेले नाहीत, वादीने खरी वस्तुस्थिती लपवून ठेवली असल्याने वादीला इक्वीटीच्या स्वरूपात कोणतीही दाद मागता येणार नाही, वादीने दाव्यात दिलेली वंशावळ प्रतिवादींना मान्य नाही, प्रतिवादी क्र.३ चे वय २२ वर्षे असल्याचे वादीने खोटे नमूद केले असून प्रत्यक्षात प्रतिवादी क्र.३ अभिषेक वसंत माळी याचा जन्म दि.१६/०५/२००९ रोजीचा असल्याने प्रस्तुत दावा दाखल झाला त्या तारखेस प्रतिवादी क्र.३ हा १६ वर्षे वयाचा असल्याने वादीने अज्ञान व्यक्तीविरूद्ध दावा दाखल केला असून दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ चा आदेश ३२ नुसार कोणतीही पुर्तता वादीने केलेली नसल्याने वादीचा दावा व तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे, दावा मिळकतीचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ८५ नुसार वाटप झाले असल्याचे वादीचे कथन आहे, परंतु, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ८५ नुसार झालेल्या वाटपात वादीला कोणते क्षेत्र प्राप्त झाले व वादीच्या हिश्श्याला आलेल्या क्षेत्राच्या चतु:सीमा वादीने दाव्यात व प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जात नमूद केलेल्या नाहीत, वादीच्या म्हणण्यानुसार झालेल्या वाटपात दावा मिळकतीमधील कोणत्या चतु:सीमेचे क्षेत्र वादीच्या हिश्श्यास आले आहे याबाबत वादीने दावा व प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जात स्पष्ट कथने करून त्याबाबत पुरावा दिल्याखेरीज प्रतिवादींविरूद्ध कोणत्याही प्रकारचा मनाई आदेश वादीला मागता येणार नाही, वादीचा दावा व प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज यामधील वादीची कथने पाहता वादीने संपूर्ण दावा मिळकतीबाबत मनाई आदेश मागितला असल्याचे दिसून येते, दावा मिळकत ही कै.शंकर संतू माळी व श्री.गणपती कृष्णा माळी यांना वारसा हक्काने व झालेल्या वाटपानुसार त्यांच्या पूर्वहक्कदारांकडून प्राप्त झालेल्या शेत मिळकती आहेत, दावा मिळकती वादी सांगतात त्याप्रमाणे तीन पिढीपासून आलेल्या वडीलार्जित मिळकती नाहीत, दत्तक गेल्यानंतर वादीला जनक वडीलांच्या मिळकतीमध्ये कायद्यानुसार कोणताही हक्क प्राप्त होत नाही, कै.गणपती कृष्णा माळी यांचा ०८ आणे हिस्सा व जनक वडील शंकर संतू माळी यांच्या वडीलार्जित मिळकतीमधील ०४ आणे हिश्श्याची मिळकत असे हक्क वादीला कधीही प्राप्त झालेले नसल्याने वादीचा दावा मिळकतीमधील १२ आणे हिश्श्यात कधीही मालकी हक्क कब्जा नव्हता, वादीला दत्तक वडीलांकडून

MADHAVI RAMESH PATKAR
Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.04.23 17:56:44 +0530

मिळालेल्या मिळकती वादीने आपल्या ताब्यात घेऊन आपल्या कुटुंबातच वेगवेगळ्या दस्ताने तबदिल केल्या आहेत, दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर बऱ्याच व्यक्तींची नावे मालक-कब्जेदार सदरी दिसून येतात, परंतु, सदर व्यक्तींना वादीने याकामी पक्षकार केलेले नाही, त्यामुळे वादीच्या दाव्यास आवश्यक पक्षकार समाविष्ट केलेले नाहीत, वादीकडे दावा मिळकतीचा संपूर्ण मालकी हक्क असल्याबाबत व दावा मिळकतीच्या १२ आणे हिश्श्यात वादीची कब्जे वहिवाट असल्याबाबत कोणताही पुरावा वादीने दिलेला नाही, दावा मिळकतीमध्ये सद्यस्थितीत काय पिके आहेत याचा तपशील वादीने दावा व प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज यामध्ये दिलेला नाही, प्रतिवादींच्या कब्जेवहिवाटीमधील गट क्र.१०९८ मध्ये द्राक्ष बाग तीन एकर व गहू पिक दोन एकर असून गट क्र.१०८० मध्ये ०.३५ आर क्षेत्रात ऊस पिक असून गट क्र.१०९० मध्ये २.५ एकर गहू पिक असून काही क्षेत्र कॅनॉलमध्ये गेले आहे आणि गट क्र.९०५ मध्ये तीन एकर ऊस पिक, एक एकर खोडवा ऊस, एक एकर हत्ती ग्रास हे प्रतिवादींनी स्वत: वाढविलेले असून उर्वरित क्षेत्र पिक लागणीसाठी तयार आहे आणि गट क्र.१०९७/६ मध्ये सात एकर क्षेत्र ऊस, चार विहिरी व उर्वरित क्षेत्र लागणीस तयार आहे अशी वस्तुस्थिती असून वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये त्यांच्या पूर्वहक्कदारांपासून प्रत्येकी ०८ आणे क्षेत्रामध्ये वहिवाट करतात, सन २०१८ पर्यंत दावा मिळकतीच्या वहिवाटीबाबत वादी, प्रतिवादींमध्ये कोणताही वाद नव्हता, परंतु, त्यानंतर वादीने प्रतिवादींच्या ताब्यातील क्षेत्रामध्ये ०४ आणे हिस्सा असल्याचा बनाव सुरू करून महसूली तक्रारी केल्या, दावा मिळकतीत वादीचे १२५ टन गहू पिक असल्याचा वादीने काल्पनिक बनाव केला असून प्रतिवादींच्या ०८ आणे हिश्श्यातील गहू व द्राक्षे पिकावर हक्क सांगण्यासाठी वादीने दाव्याची उभारणी करून तुर्तातुर्त ताकीद मागितली आहे, वादीला सहहिस्सेदारांविरूद्ध मनाई हुकूम मागता येणार नाही, दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादींच्या प्रत्येकी ०८ आणे हिश्श्याप्रमाणे स्वतंत्र वहिवाटी असून प्रतिवादींनी वादीच्या ०८ आणे हिश्श्यातील वहिवाटीस कधीही हरकत अडथळा केलेला नाही, वादीच्या प्रथमदर्शनी दावा नाही, वादीचा प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज मंजूर झाल्यास त्या आदेशाचा वादी गैरफायदा घेऊन दावा मिळकतीमधील प्रतिवादींच्या ०८ आणे हिश्श्यात प्रतिवादींनी वाढविलेली द्राक्षे, ऊस, गहू पिके काढून नेऊन प्रतिवादींचे वादी नुकसान करेल, याउलट तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, त्यामुळे, प्रतिवादींनी प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीसाठीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

MADHAVI RAMESH PATKAR

Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.04.23 17:56:50 +0530

**०३.** वादीने आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ मौजे कडेगांव येथील गट क्र.९०५ चा सन २०२४-२०२५ चा ७/१२ उतारा, मौजे कडेगांव येथील गट क्र.१०८० चा सन २०२४-२०२५ चा ७/१२ उतारा, मौजे कडेगांव येथील गट क्र.१०९० चा सन २०२४-२०२५ चा ७/१२ उतारा, मौजे कडेगांव येथील गट क्र.१०९७/६ चा सन २०२४-२०२५ चा ७/१२ उतारा, मौजे कडेगांव येथील गट क्र.१०९८ चा सन २०२२-२०२३ ते सन २०२४-२०२५ चा ७/१२ उतारा, मौजे कडेगांव येथील फेरफार क्र.४९३५ चा फेरफार उतारा, मौजे कडेगांव येथील फेरफार क्र.१७४४ चा फेरफार उतारा, एम.ए.जी.चॅ.केस-एस.आर./२४६/२०२५ मधील मा.तहसिलदार तथा

कार्यकारी दंडाधिकारी कडेगांव यांचा दि.०१/०४/२०२५ रोजीचा आदेश, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कडेगांव यांचे कोर्टातील क्र.एमएजी/कावी/२४६/२०२५ चे दि.०४/०४/२०२५ रोजी मा.पोलीस निरीक्षक, कडेगांव यांना दिलेले पत्र, वस्तुस्थितीदर्शक गव्हाचे व द्राक्षाचे एकूण दोन फोटो असे कागदपत्र नि.क्र.०३ वरील यादीसोबत वादीने हजर केले असून वादीने वाद मिळकतीत केलेल्या गहू पिकाचे वस्तुस्थितीदर्शक दोन फोटो, वादीने वाद मिळकतीत केलेल्या द्राक्ष पिकाचे वस्तुस्थितीदर्शक दोन फोटो, फोटोची सी.डी., फोटोचे बिल असे कागदपत्र नि.क्र.२४ वरील यादीसोबत वादीने हजर केलेले आहेत.

**०४.** प्रतिवादी क्र.१ ते २ ने याकामी आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ प्रतिवादी क्र.३ च्या आधारकार्डची प्रत नि.क्र.१९/१ लगत दाखल केली असून प्रतिवादी क्र.३ चा जन्म झालेबाबत अश्विनी हॉस्पीटल मिरज यांनी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांना दिलेली नमुना क्र.१ जन्म अहवालाची प्रत, प्रतिवादी क्र.३ चे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्ड, पुणे यांचे इयत्ता दहावीचे परिक्षा प्रवेशपत्र, कडेगांव येथील दावा मिळकत गट क्र.९०५ मध्ये वादीने सुमारे सहा महिन्यापासून अधिक काळ दांडगाव्याने उभा केलेल्या ट्रॅक्टरचा फोटो, कडेगांव येथील दावा मिळकत गट क्र.९०५ मधील प्रतिवादीचे गव्हाचे पिकाचा फोटो, कडेगांव येथील दावा मिळकत गट क्र.९०५ मधील वादीने सोयाबीन पिक जाळलेबाबतचा फोटो, कडेगांव येथील दावा मिळकत गट क्र.९०५ मधील प्रतिवादींचे पिक वादी जबरदस्तीने व दांडगाव्याने काढून नेत असल्याबाबतचे वस्तुस्थितीदर्शक फोटो, प्रतिवादींनी पोलीस स्टेशनला दिलेली तक्रार क्र.५९८/२०२४ ची प्रत, प्रतिवादी क्र.१ यांनी पोलीस ठाण्याला दिलेली तक्रार क्र.७९/२०१९ ची प्रत, मा.जिल्हाधिकारीसो सांगली यांनी आर.टी.एस. दुसरे अपील क्र.२६९/२०२३ मधील निकालाची समज असे कागदपत्र नि.क्र.२८ वरील यादीसोबत प्रतिवादी क्र.१ ते २ ने हजर केले असून मा.जिल्हाधिकारीसो सांगली यांचेकडील आर.टी.एस. दुसरे अपील क्र.२६९/२०२३ मधील अपीलमेमो, दि.२८/०५/२०१२ रोजीचे हक्कसोडपत्र असे कागदपत्र नि.क्र.३० वरील यादीसोबत प्रतिवादी क्र.१ ते २ ने हजर केले आहेत.

**०५.** वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत खटल्यात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर खालील वादबिंदू माझ्या विचारार्थ येत असून त्यावरील माझे निष्कर्ष कारणासहीत खाली नोंदविले आहेत -

| **अ.क्र** | **वादबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत केले आहे का? | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे, असे वादीने शाबीत केले आहे का ? | नाही. |

MADHAVI RAMESH PATKAR

Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.04.23 17:56:55 +0530

| | | |
|---|---|---|
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होईल असे वादीने शाबीत केले आहे का ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | नि.२१ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**०६.** प्रस्तुत खटल्यातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, मौजे कडेगांव, ता.कडेगांव येथील गट क्र.९०५, गट क्र.१०८०, गट क्र.१०९०, गट क्र.१०९७/६ व गट क्र.१०९८ च्या जमीनी म्हणजेच दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या पूर्वहक्कदारांची मूळची वडीलार्जित मिळकत आहे, याबाबत वाद उपस्थित झालेला नाही. दावा मिळकतीमध्ये वादीचा १२ आणे हिस्सा असून दावा मिळकतीच्या १२ आणे हिश्श्यामध्ये वादीची मालकी हक्काने कब्जेवहिवाट असल्याचे वादीचे कथन आहे. याउलट, दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादींचा प्रत्येकी ०८ आणे हिस्सा असून दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी ०८ आणे हिश्श्याप्रमाणे वादी व प्रतिवादींची पृथक व अलग वहिवाट असल्याचे प्रतिवादींनी कथन केले आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमधील वादीच्या १२ आणे हिश्श्याच्या क्षेत्रात वादीचे गहू (१२५ टन) व द्राक्षे (४० टन) पिक असून ते पिक काढण्यायोग्य झाले आहे आणि प्रतिवादींनी हरकत करून सदर पिक काढण्यास मज्ञाव केला असल्याने प्रतिवादींविरूद्ध तुर्तातुर्त ताकीद देण्याची वादीने विनंती केली आहे. याउलट, दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादींच्या प्रत्येकी ०८ आणे हिश्श्याप्रमाणे स्वतंत्र वहिवाटी असून प्रतिवादींनी वादीच्या ०८ आणे हिश्श्यातील वहिवाटीस कधीही हरकत अडथळा केलेला नाही आणि प्रतिवादींच्या ०८ आणे हिश्श्यातील क्षेत्रामध्ये प्रतिवादींचे गहू व द्राक्षे पिक असून त्या पिकावर हक्क सांगण्यासाठी वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला असल्याचे प्रतिवादींचे कथन आहे.

**०७.** वादीने दाव्यात कथन केले आहे की, दावा मिळकतीचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ८५ नुसार वाटप झाले असून सदर दावा मिळकतीत वादीला दत्तकपत्राने कै.गणपती कृष्णा माळी यांच्या ०८ आणे हिश्श्याची मिळकत व वादीचे जनक वडील शंकर संतू माळी यांच्या वडीलार्जित मिळकतीमधील ०४ आणे हिश्श्याची मिळकत वादीला मिळालेली असून वादीची दावा मिळकतीमध्ये शांततामयरित्या प्रत्यक्ष कब्जेवहिवाट आहे. प्रतिवादींनी हरकत घेतली आहे की, वादीच्या म्हणण्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ८५ नुसार झालेल्या वाटपात वादीला कोणते क्षेत्र प्राप्त झाले व वादीच्या हिश्श्याला आलेल्या क्षेत्राच्या चतु:सीमा वादीने दाव्यात व प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जात नमूद केलेल्या नाहीत, वादीच्या म्हणण्यानुसार झालेल्या वाटपात दावा मिळकतीमधील कोणत्या

MADHAVI RAMESH PATKAR

Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.04.23 17:57:01 +0530

चतु:सीमेचे क्षेत्र वादीच्या हिश्श्यास आले आहे याबाबत वादीने दावा व प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जात स्पष्ट कथने करून त्याबाबत पुरावा दिल्याखेरीज प्रतिवादींविरूद्ध कोणत्याही प्रकारचा मनाई आदेश वादीला मागता येणार नाही. दोन्ही पक्षांनी याकामी दाखल केलेले दावा मिळकतीबाबतची महसूल विभागाची कागदपत्रे पाहिली असता प्रतिवादींनी घेतलेल्या हरकतीमध्ये तथ्य असल्याचे दिसून येते. दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावरून वादी व प्रतिवादी हे सहहिस्सेदार असल्याचे स्पष्ट होत असल्याने वादीच्या मालकीहक्क कब्जेवहिवाटीच्या क्षेत्राबाबत स्पष्ट चतु:सीमा नमूद करून वादी हक्क सांगत असलेल्या दावा मिळकतीपैकी क्षेत्राचे स्पष्ट वर्णन वादीने देणे आवश्यक होते. परंतु, 'वादीच्या म्हणण्यानुसार झालेल्या वाटपात दावा मिळकतीमधील कोणत्या चतु:सीमेचे क्षेत्र वादीच्या हिश्श्यास आले आहे आणि वादीची कब्जेवहिवाट व वादीचे गहू (१२५ टन) व द्राक्षे (४० टन) पिक दावा मिळकतीपैकी कोणत्या चतु:सीमेच्या क्षेत्रात आहे', हे वादीने कथन केलेले नाही. अभिलेखावरील वादी व प्रतिवादींची कथने तसेच, दाखल कागदपत्रे यावरून संपूर्ण दावा मिळकत वादीच्या कब्जेवहिवाटीत नसल्याचे स्पष्ट होते.

**०८.** वरील चर्चेनुसार दिसून आलेल्या परिस्थितीत, दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी हे सहहिस्सेदार असल्याचे तसेच, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचादेखील हक्क हितसंबंध, वहिवाट असल्याचे आणि संपूर्ण दावा मिळकत वादीच्या कब्जेवहिवाटीत नसल्याचे अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्यावरून प्रथमदर्शनी दिसत असल्याने प्रस्तुत दावा प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने नसल्याचे दिसून येत असून वादीच्या कब्जेवहिवाटीच्या क्षेत्राच्या चतु:सीमा स्पष्ट करण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने याकामी दाखल केलेला नाही. वादी व प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये आपली पिके असल्याचे कथन केलेले आहे. अशा परिस्थितीत, संपूर्ण दावा मिळकतीबाबत प्रतिवादींविरूद्ध तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश दिल्यास कायदेशीर प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, प्रस्तुत दावा प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने नसल्याचा निष्कर्ष नोंदविलेला असल्याने प्रतिवादींविरूद्ध वादीच्या विनंतीप्रमाणे तुर्तातूर्त मनाई आदेश दिल्यास वादीचे पैशाच्या स्वरूपात भरून न येणारे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही. अशा परिस्थितीत, न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने झुकत नसल्यामुळे, 'वादीच्या विनंतीप्रमाणे तुर्तातुर्त ताकिद प्रतिवादींविरूद्ध मिळण्यास वादी पात्र नाहीत, असा निष्कर्ष निघतो. परिणामी, वादबिंदू क्र.१ ते ३ चे उत्तर मी 'नकारार्थी' देते आणि वादबिंदु क्र.४ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते-

**०१.** वादीचा नि.क्र.२१ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

**०२.** अर्जाचा खर्च दाव्यासोबत.

MADHAVI RAMESH PATKAR

Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.04.23 17:57:07 +0530

**स्थळ : कडेगांव**

**दिनांक : २३/०४/२०२५**

**(श्रीम.माधवी र. पाटकर)**

**सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कडेगांव**

**प्र.२ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कडेगांव**